The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue 3; March 2024

# 'संत संत चोखामेळा यांचे वांग्मयीन कर्तृत्व

**प्रा. डॉ. दत्ता रुस्तुमराव शिंदे**
सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख,
संत तुकाराम कला व विज्ञान महाविद्यालय, परभणी- 431401.

**प्रास्ताविक:** वारकरी संप्रदायाचे मराठी साहित्य समृद्ध करण्यामध्ये महत्वाची योगदान आहे. संत ज्ञानदेव व संत नामदेव यानी या संप्रदायाचा उत्तर भारतात पंजाबापर्यंत प्रचार व प्रसार केला. पुढे संत एकनाथ, संत तुकाराम, संत बहिणाबाई, संत निळोबांपर्यंत ही मोठी परंपरा या संप्रदायाला लाभली आहे. सगुण साकार आशा विठ्ठल भक्तीच्या प्रेरणेतून सर्व साहित्याचे लेखन झालेले आहे. वर्ण व्यवस्थेने निर्माण केलेली विषमता मोडीत काढण्याचा प्रयत्न सर्व संतांनी केलेला आहे. भक्तीच्या क्षेत्रामध्ये जाती- गोत्र, लहान थोर, स्त्री पुरुष असा कोणताही भेदभाव मांनला नाही. माणसाचे मोठेपण त्याच्या जातीवर नाही ; तर त्याच्या कर्तृत्वावर अवलंबून असते. असा संदेश या संतांनी दिला आहे. 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म ' अशी शिकवण या संप्रदायाने दिल्ली. 'यारे यारे लहान थोर ' अशी हाकही सर्वांना दिली. यातूनच सामाजिक समता प्रस्थापित करण्याचे काम या संतांनी केली आहे. अठरापगड जातीचे संत एकत्र येऊन विश्वबंधुत्वाचा आदर्श समाजासमोर ठेवला ; आणि यातूनच संत नामदेव , संत ज्ञानदेव, संत गोरोबा, संत जनाबाई, संत नरहरी सोनार, संत चोखामेळा, संत कर्ममेळा, संत सोयराबाई, संत मुक्ताबाई, संत सोपानदेव, संत निवृत्तीनाथ, संत सावतामाळी, संत सेना न्हावी, संत कान्होपात्रा, संत एकनाथ, संत तुकाराम, संत बहिणाबाई संत निळोबा अशी संतांची मांदियाळी निर्माण झाली. त्यांनी आपल्या वर्तनातून व लेखनातून समाजाला एक आदर्श घालून दिला. त्यांच्या जातीचे अथवा व्यवसायाची संदर्भ त्यांच्या लेखनातून पाहायला मिळतात. 'अशा या संत परंपरेत श्री संत चोखामेळा यांचे स्थान अनन्यसाधारण आहे. सामाजिक दृष्ट्या अवमानल्या गेलेल्या कुळामध्ये जीवन जगणाऱ्या चोखामेळ्यांनी आपल्या भक्तीबळावर व आत्मनिष्ठेवर एवढे मोठे स्थान प्राप्त करून घेतले आहे की, कालसागरामध्ये सर्व मानव जातीला मार्गदर्शक ठरावे अशा दीपस्तंभाचे महत्त्व त्यांना आले आहे ' 1 या दृष्टीने स.भा . कदम यांचे हे मत महत्त्वाचे वाटते. प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय संत चोखामेळा यांचे वांग्मयीन कर्तृत्व असा असून, त्यामध्ये संत चोखामेळा यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व त्यांच्या कवितेचा अभ्यास केलेला आहे. संत चोखोबांचा जीवन वृत्तांत : संत चोखामेळा यांच्या जन्मस्थळ व जन्मकाळाविषयी फारशी विश्वसनीय माहिती उपलब्ध होत नाही. अस्पृश्य गणल्या जाणाऱ्या महार जातीमध्ये संत चोखामेळा यांचा जन्म झाला आहे. त्यांच्या जन्मा विषयीची

एक आख्यायिका प्रसिद्ध आहे. कोरेगावच्या पाटलाने सुदामा व सावित्री या येस्कर दांपत्याजवळ 125 आंबे पंढरपूरला पोहोचविण्यासाठी दिले असता, त्यामध्ये एक आंबा कमी भरला आणि त्या चोखलेल्या आंब्यापासून जन्माला आले ते चोखामेळा अशी ही आख्यायिका सांगितली जाते. यावरून संत चोखामेळा यांचा जन्म अयोनिक असल्याचे मानले जाते. दारिद्र्य, लेखन वाचनाची कुठलीही परंपरा नसताना संत नामदेव संत ज्ञानदेव यांच्या सोबत राहून संत चोखामेळा बहुश्रुत झाले. अस्पृश्यतेचे दुःख त्यांच्या वाट्याला आले. देव बाटवला म्हणून दोन वेळेस शिक्षाही सहन करावी लागली. परंतु यावेळीही विठ्ठलाने त्यांचे रक्षण केले. प्रत्यक्ष विठ्ठलाने त्यांना अनेक वेळा मदत केल्याचे संत नामदेवांच्या एका अभंगातून पाहायला मिळते. संत ज्ञानदेव व संत नामदेवांसोबत संत मेळ्यामध्ये त्यांनी आपले अनन्य असे स्थान आपल्या वर्तनातून निर्माण केले. अनेक तीर्थक्षेत्रे फिरल्यानंतर शेवटी पंढरपूर येथे मन स्थिरावल्याचे संत चोखामेळा सांगतात. पंढरपूर आणि मंगळवेढा ही त्यांची अखेरपर्यंत कर्मभूमी राहिली आहे. संत चोखामेळा यांना जसे आयुष्यभर अस्पृश्यतेचे दुःख भोगावे लागले. तसा त्यांचा शेवटही अत्यंत दुःखद असाच झाला. मंगळवेढ्याच्या गावकुसाच्या कामास अनेकांना वेठबिगारीवर आणण्यात आले होते. त्यात संत चोखामेळा हेही होते. एक दिवस ही भिंत कोसळून संत चोखामेळा यांचा अंत झाला. संत चोखामेळा यांचे गुरु संत नामदेव यांच्या अभंगातील उल्लेखानुसार संत नामदेवांनी मंगळवेढा येथे जाऊन विठ्ठल नामाचा गजर करणाऱ्या चोखोबांच्या अस्थी पंढरपुरात आणून महाद्वारा त्यांची समाधी बांधली ती इस 1338 मध्ये. गुरुने आपल्या शिष्याची समाधी बांधण्याचा हा आगळावेगळा प्रसंग संत चोखामेळा यांच्या बाबतीत घडला. ही समाधी वारकऱ्यांच्या श्रद्धेचा विषय बनून गेली आहे. संत चोखामेळा

यांचे अभंग लेखन : संत चोखोबांची अभंग रचना अनंत भट नावाच्या ब्राह्मणाने उतरवून घेतली असा उल्लेख सापडतो. त्यातूनच त्यांची अभंगवाणी जन्मास आली. त्यांचे 350 एवढे अभंग उपलब्ध आहेत. आत्मनिवेदन, गुरु व संतांचा गौरव, विठ्ठल महिमा, तत्कालीन समाज स्थितीवर भाष्य करणारे अभंग, विटाळावरील अभंग अशा विविध अंगानी संत चोखामेळा यांच्या अभंगाची स्वरूप लक्षात घेता येते. चोखोबांनी आत्मनिवेदनात्मक अभंगातून बरेच काही सांगण्याचा प्रयत्न केला आहे. महार जातीमध्ये जन्मास येण्याची कारण मीमांसा करताना ते म्हणतात,' कृष्ण निंदा घडली होती, म्हणूनी महार जन्म प्राप्ती!' आपल्याला पूर्वजन्मीचे हे मिळालेले फळ आहे. तसाच आपल्या मागे विटाळ लागला हेही पूर्वीचेच फळ असल्याचे असल्याचे संत चोखामेळा सांगतात. जन्मास येणे मनुष्याच्या हाती नसले तरी जन्मास आल्यानंतर सत्कर्म करून माणूस उच्च पदाला पोहोचू शकतो, हे त्यांनी प्रत्यक्ष दाखवून दिले. याबरोबरच समाज स्थितीचे वर्णन करताना ते म्हणतात,' येथे तो संग आहे दुर्जनांचा! म्हणून सीन त्याचा होत आहे! ' समाजातल्या या अशा प्रवृत्ती बद्दल संत चोखामेळा खेद

**'संत संत चोखामेळा यांचे वांग्मयीन कर्तृत्व'**

**प्रा. डॉ. दत्ता रुस्तुमराव शिंदे**

व्यक्त करतात. विटाळावरील अभंगातून चोखोबांनी आपली चिकित्सक मते नोंदवली आहेत. पाचही महाभूतांना विटाळ आहे. विटाळाच्या वेगळा कोणीही नाही. म्हणून आम्हालाच फक्त विटाळ कसा? असा सवालही ते करतात. विठ्ठल हा सर्वांकडे समत्व दृष्टीने पाहणारा आहे.'कोण तो सोवळा कोण तो ओवळा! दोहीच्या वेगळा विठू माझा!' वेदशास्त्र , पुराने ही सगळी विटाळलेलीच आहेत. ब्रह्म, विष्णू, महेश या सगळ्यांनाच विटाळ स्पर्शून आहे. संत चोखामेळा लिहितात, 'जन्मता विचार मरता विटाळ! चोखा म्हणे विटाळ आदि अंति!' विटाळा शिवाय या सृष्टीमध्ये काहीच नाही. सृष्टीच्या आदि आणि अंती सुद्धा विटाळच संचलेला आहे. असा विटाळ सर्वत्र संचारलेला असताना आम्हीच विटाळलेले कसे? असा प्रश्न ते उपस्थित करतात . चोखोबांनी आपल्या अभंगातून उपदेशही केला आहे. मानवी देह हा काळाचे खाद्य आहे. काळा समोर कोणाचे काहीही चालत नाही. त्यासाठी आपण संतांची संगती धरली पाहिजे. सहा विकारांपासून दूर राहिले पाहिजे. व सदाचरण केले पाहिजे. असा उपदेश ते करतात. 'एकलेची यावे एकलेची जावे! हेचि अनुभवावे आपणासी!' हे जीवनाचे अंतिम सत्य चोखामेळा चपखलपणे सांगून जातात. तसेच विठ्ठलाची भक्ती करताना आपला भाव व चित्त शुद्ध असले पाहिजे असे सांगतात 'चोखा डोंगा परी भाव नव्हे डोंगा! काय भुललासी वरलीया रंगा!' मनुष्य कोणत्या जातीचा आहे हे महत्त्वाचे नसून त्याने शुद्ध अंतकरणाने केलेली भक्ती महत्त्वाची ठरते असे संत चोखामेळा सांगतात. नामाचे महत्त्व मोठे आहे. हा नामाचा जप एक चित्ताने केला पाहिजे. माकडापरी मान हलवून जगाला मोठेपणा दाखवणारे ढोंगी साधूनाही चोखामेळा फटकारतात. चोखा म्हणे ऐसा जगामध्ये भोंदू! तया कोण साधू म्हणे देवा!' साधू कसा नसावा हे जसे ते सांगतात तसेच, 'साधन ते एक जगाशी प्रमाण! परदारा परधन वमन जैसे!! ऐसा ज्याचा भाव तोचि एक साधू! येर अवघे भोंदू जगामाझी!!' चांगल्या साधूचे लक्षणे सांगायलाही ते विसरत नाहीत. संत चोखामेळा आपल्या अभंगातून नामाचे महत्त्वही विशद करतात. नामस्मरणासाठी कुठलाही उपचार करावा लागत नाही, खटपट करावी लागत नाही, त्यासाठी कुठला खर्चही येत नाही. ' हातीच्या काकणा कायसा आरसा! धरावा भरवसा विठ्ठल नामे!!' एवढी नामावर त्यांची दृढ निष्ठा आहे. कारण नामासारखे अन्य साधन नाही. सर्व साधनाचे मूळ बीज म्हणजे विठ्ठलाचे नामच आहे. याचा पुनरुच्चार ते करतात. चोखोबांनी आपले दैवत म्हणजेच विठ्ठलाचे नाममहात्मेही अभंगातून वर्णन केले आहे.विठ्ठल हा अनादी, निर्मळ , आनंदाचा कंद , सर्व सुखाचे सुख, योगीयाचा राणा, पुंडलिकासाठी विटेवर उभा असणारा, असा सुखाचा निधान अशा विठ्ठलाचे गुण वर्णन करतात. 'ज्या कारणे वेद श्रुती अनुवादिती! तो हा रमापती पंढरीये!!' असा हा विठ्ठल वेदांना व शास्त्रांना न कळणारा असा त्याचा महिमा आहे. संत चोखामेळा विठ्ठलाचे वर्णन करताना 'लावण्याचा गाभा त्र्यलोक्याची शोभा! विटेवरी उभा पंढरीये!!' पंढरी म्हणजे प्रत्यक्ष भूवरील वैकुंठच आहे, असे ते म्हणतात. संत चोखामेळा यांनी आपल्या अभंगातून पंढरी महात्मेही भरभरून

वर्णन केले आहे.'पंढरीचे सुख नाही त्रिभुवनी! प्रत्यक्ष चक्रपाणि उभा तेथे!!' प्रत्यक्ष भक्तांना गळाभेट देणारा विठ्ठल पंढरपुरात त्याची वाट बघत असतो. अनेक तीर्थी फिरलो परंतु कुठेच मन स्थिर झाले नाही, असा स्वानुभव सुद्धा संत चोखामेळा सांगतात.'एक वेळा पंढरी वाचे जो उच्चारी! मोक्ष त्याचे घरी नांदत असे!!' पंढरीचे असे महिमान चोखोबा वर्णन करतात. " चोखोबांची भक्तीभावनेची आर्तता करून रम्य आहे ' 2 असे उद्‌गार डॉ रमेश मोदी संत चोखोबांबद्दल काढतात. संत चोखामेळा यांच्या अभंगाचा मोठा कप्पा ज्या अभंगांनी व्यापलेला आहे, ते त्यांच्या अंतरीचे दुःख , त्यांची वेदना त्यातून व्यक्त झालेली आहे. यामध्ये आपण हीन जातीत जन्माला आल्याचे दुःख त्यांनी व्यक्त केले आहे. प्रसंगी विठ्ठलाला त्याचा जाबही विचारतात. प्रत्यक्ष विठ्ठल मूर्ती बाटवली म्हणून त्यांना इथल्या व्यवस्थेचा मारही खावा लागला. गं.बा. सरदार लिहितात, 'परंपरेचे दडपण झुगारून देऊन अनेकदा त्यांची अस्मिता जागी होई. सामाजिक अन्यायाबद्दलचा त्यांचा असंतोष उफाळून येई.' 3 हा संत चोखामेळा यांच्या बद्दलचा निष्कर्ष येथे उचित वाटतो.' एकाशी कदांन्न एकाशी निष्ठांन्न ' असा भेद का? असा सवालही ते विचारतात. विठ्ठल हा कनवाळू आहे, तूच मायबाप आहेस, म्हणून तूच आम्हाला पदरात घ्यावे, अशी करुणा विठ्ठलाजवळ भाकतात. तूच अनाथांचा नाथ आहेस. आजवर तुला शरण आलेल्यांचा तू प्रतिपाळ केला आहेस. अशी तुझी पूर्वपरंपरा आहे. माझेही दुःख तूच दूर करावे असा भाव अभंगातून व्यक्त करतात. एकंदरीत चोखामेळा यांचे वारकरी संप्रदायातील स्थान महत्त्वाचे आहे. जातिहिनतेचे दुःख त्यांनी आपल्या अभंगातून मांडले, कारुण्यमय अशी ही त्यांची रचना आहे, विटाळा बद्दल त्यांनी परखड मत प्रतिपादन केले आहे, माणसाची उंची जातीवर नसून कर्मावर आधारित असल्याचे मत ते नोंदवतात, प्रसंगी विठ्ठलाला या सगळ्या परिस्थितीबद्दल जाबही विचारतात. यासोबतच विद्रोहाची संयत मांडणी करण्याचा काहीसा प्रयत्न करतात असे म्हणावे लागते.

**संदर्भ ग्रंथ :**

1) कदम स. भा. (सं.), पृ.26,' श्री संत चोखामेळा चरित्र आणि अभंग', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, दुसरी आवृत्ती, मार्च 1998.

2) सरदार गं. बा. पृ. 81,'संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती', लोक वांग्मय गृह, मुंबई, आवृत्ती चौथी, 1982.

3) मोदी रमेश पृ. 74, 'संत चोखोबांचे अभंग समीक्षा आणि संहिता', विजय प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती, 1998.

**'संत संत चोखामेळा यांचे वांग्मयीन कर्तृत्व'**

**प्रा. डॉ. दत्ता रुस्तुमराव शिंदे**